## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| भारतीय समाजाकडून दलितांना न्याय ? कधीच मिळणार नाही काय ? | २ |
| मोक्ष की कपाळमोक्ष ? | ४ |
| देवी नाही, दासी नाही, वस्तु नाही, आम्ही माणूस आहोत | ७ |
| आशाची कहाणी | ९ |
| टाहो ( कविता ) | ११ |
| ॲग्नेस स्मिडले–एक झुंजार स्त्री | १२ |
| झुंज (कादंबरी) | १८ |
| स्त्रिया व ग्रामपंचायतीच्या निवडणुका | २१ |
| अधार वाट (कथा) | २३ |
| पूजा | २६ |
| आगळे वेगळे प्रदर्शन | २७ |
| धनाजी बळी गेला ! सोनबाची काय वाट ! | ३१ |
| सावित्रीबाई स्त्री मुक्ती संघटनेची स्थापना | ३२ |
| कामाचा हक्क आणि बेकारी हे कोडं सुटायचं कसं ! | ३४ |
| सरकारचे सॅन्सॉर नवधोरण | ३८ |


सूचना : बायजाकडे आपणहून पाठवलेले लेख, कविता इत्यादी साहित्य पाठविल्यापासून पुढील दोन अंकात छापून न आल्यास ते स्वीकारले नाही असे समजावे. त्यासंबंधात पत्रव्यवहार करता येणे शक्य होणार नाही याबद्दल दिलगीर आहोत.

★ अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


संपादक
सौदामिनी राव

साहाय्यक
लीला भोसले, लता [illegible]

पत्रव्यवहाराचा पत्ता :
सौदामिनी राव, ९७ प्रभात रस्ता, पुणे ४.


# संपादकीय

**१५ ऑगस्ट १९७८ ! स्वातंत्र्यप्राप्ती होऊन संसदीय लोकशाही भारतात स्थापन झाल्यानंतरचे एकतिसावे पान उलटले ! आर्थिक विकासासाठी नियोजनाला प्रारंभ करून सत्तावीस वर्षे झाली ! एवढ्या वर्षातील बेरीजवजाबाकीचे उत्तर काय ?** आर्थिक प्रगती वरवर पाहाता बरीच केली. अन्नधान्याचे उत्पन्न दुपटाहून वाढले, लोखंड, पोलाद, यंत्रसामग्रीचे प्रचंड कारखाने उभे राहिले, अलिशान हॉटेले, सिनेमाउद्योग दिमाखाने आपला विस्तार वाढवीत आहेत, चैनीच्या वस्तूने बाजारपेठा ओसांडून जात आहेत. परंतु धान्याची कोठारे तुडुंब भरली तरी उपासमार दूर होते का ? नियोजनाद्वारा आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारला तरी बेकारांची संख्या दोन कोटीवर का जाते ? घटनेमध्ये सर्व नागरिकांना समान हक्क बहाल केले तरी कष्टकरी, दलित, स्त्रिया यांची पिळवणूक व ससेहोलपट कमी होते का ? पोटापुरती मजुरी शेतमजुरांनी मागितली तर ती चळवळ निर्दयपणे दडपली का जाते ?

धार्मिक रूढी व जन्माधिष्ठित जातीव्यवस्था यांच्या जोखडाने हिंदूसमाजाने दलितांना शतकानुशतके गुलामगिरीत बांधून ठेवले होते. त्यांना संपत्तीचा हक्क नव्हता, शिक्षणाचा हक्क नव्हता. माणूस म्हणून जगण्याचा हक्क नव्हता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कायदेशीर तरतुदी करून ह्या अमानुष समाजव्यवस्थेच्या जोखडातून दलितांना बाहेर पडता यावे यासाठी प्रयत्न सुरू झाले. दलितांची अस्मिता जागी होऊ लागली, प्रसंगी विद्रोह व्यक्त होऊ लागला. दलितांना आर्थिक–सामाजिक न्याय मिळणे दूरच, परंतु त्यादृष्टीने चाललेल्या प्रयत्नांविरुद्धचा सवर्णांचा राग बेलची, विल्लापुरम, मराठवाडा येथे उफाळून आला. दलितांना समान स्थान मिळणे किती कठीण आहे हे उघड झाले. समाजातील शोषित घटकांना उचित न्याय मिळावा, प्रत्येक घटकाला आपला विकास घडवून आणण्यास वाव मिळावा या दृष्टीने समाजपरिवर्तन घडवून आणल्याशिवाय भारतीय राज्य घटनेत नमूद केलेली स्वतंत्र, समता, न्याय, बंधुभाव वगैरे उद्दिष्टे प्रत्यक्षात उतरूच शकणार नाहीत याची योग्य ती दखल आजच घेणे जरूर आहे. □